# घनकचरातुन वीज निमिर्ती प्रकल्प संभाजीनगरात उभारा-
# केंद्रिय उर्जामंत्री पियुष गोयल यांच्याकडे शिवसेना
# उपनेते खासदार चंद्रकांत खैरं यांची मागणी.
# पर्यावरण व वीज बचतीसाठी अनुदान देण्यात मागणी

**संभाजीनगर ता.८ :** घनकचरातुन वीज निमिर्ती प्रकल्पाला संभाजीनगर शहर अनुकुल असुन या प्रकल्पामुळे पर्यावरणासह वीज बचतीचा नव्या प्रकल्पांना चालना मिळेल, अशा प्रकल्पांना केंद्र शासनाने अनुदान देऊन हा प्रकल्प संभाजीनगरातच उभारण्याची मागणी शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी लोकसभेत केंद्रिय उर्जा मंत्री पियुष गोयल यांच्याकडे केली. या प्रकल्पासाठी दोन कोटी ते दहा कोटी रुपयांची मदत करण्याची मागणी केली. संभाजीनगर शहरातील दररोज निघणाऱ्या पाचशे टन कचऱ्याला हा उत्तम पर्याय असल्याचे त्यांनी सांगितले.

कचऱ्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात येऊ शकते व कचरा उचलण्याच्या वेळा मागे पुढे झाली किंवा चुकुन राहिल्यास परिसरात दुर्गंधी पसरते. हा मुद्दा लक्षात घेऊन वीज टंचाई सारख्या समस्येला प्रतिउत्तर म्हणुन योग्य पर्याय आहे. वीज निर्मितीला शासनाने प्रोत्साहान दिल्यास शहर विकास आराखड्यास उपयुक्त ठरेल. कचरा डेपो सारख्या प्रकल्पाला पुणे व संभाजीनगरातील महापालिकेने जागा राखीव केली असुन या पुढील प्रयत्नांना शासनाने मदत करुन अनुदान देण्याची मागणी केली.

केंद्रिय उर्जा मंत्री पियुष गोयल यांना लोकसभा अध्यक्षा सुमित्रा महाजन यांनी या संबंधी सांगितले की खासदार चंद्रकांत खैरे महोदयांनी अतिशय योग्य गोष्ट सांगितली आहे. यामुळे स्वच्छ भारत मोहीम सफल होण्यास मदत होईल. सर्वोच्च न्यायालयाने या संबंधी निर्णयाला बंधने लादली आहेत. तरीही केंद्र शासनाने अशा प्रकल्पांना सकारात्मक दृष्टेने विचार करील असे वचन दिले. संभाजीनगर शहर पर्यटन व औद्योगिक दृष्टीने महत्वाचे असुन भविष्यात कचऱ्यांवर आधारीत प्रकल्प राबवावेच लागतील अशी मागणी खासदार चंद्रकांत खैरे यांनी केली.

- प्रसिध्दीप्रमुख